जूलै - ऑगस्ट, २०१९ मध्ये राज्यात उदभवलेल्या पुर परिस्थितीमुळे विविध उपाययोजना अंमलात आणणेबाबत व निधीच्या व्यवस्थेबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग)
शासन निर्णय क्र. : आव्यप्र-२०१९/प्र.क्र. २४३/ आव्यप्र-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक: १४ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :- १) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०१२/प्र.क्र.१५७/म-३, दि.३१/०१/२०१४
२) शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्र. सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दि.१३/०५/२०१५
३) विभागीय आयुक्त, पुणे यांचे पत्र क्र.जानं. विकास -योजना/कार्या-१/ पुपनियंत्रण/ कावि-१९६/२०१९ , दि. १२/०८/२०१९
४) शासन परिपत्रक, क्रमांक : एससीवाय-०२/२००९/प्र.क्र .४९/म-११, दि. १०.७.२००९

प्रस्तावना :

राज्यातील विविध जिल्हयामध्ये कृष्णा, कोयना, पंचगंगा, भोगावती, वारणा , वशिष्ठ, जगबुडी, उल्हास, गोदावरी, वैनगंगा, तापी, भीमा, या नदयांस आलेल्या पुरामुळे नदीकाठाच्या गावांमध्ये शहरांमध्ये भीषण पुर परिस्थिती निर्माण झाली . या पुराचे पाणी नागरी वस्तीमध्ये शिरल्याने बहुतांशी नागरीकांची घरे व त्यातील जीवनावश्यक साहित्य, इ. पाण्याखाली गेल्याने मोठया प्रमाणात नुकसान झालेले आहे. तसेच बरेच दिवस घरातील जीवनावश्यक साहित्य पाण्याखाली राहिल्याने नाशवंत झालेले आहे. तसेच मोठया प्रमाणात पशुधन व इतर प्राणी या पुरामध्ये मृत पावले आहेत. त्यांचे अवशेष जास्त काळ पाण्यात राहिल्याने रोगराई गावांमध्ये पसरण्याची शक्यता आहे.

२. पुर ओसरल्यांनतर या गावांमध्ये रोगराई येवू नये व साथींचे रोगांचा प्रादुर्भाव होवू नये यासाठी खबरदारीची उपाय योजना म्हणून प्रत्येक गावाची व परिसराची स्वच्छता करणे आवश्यक असल्यामुळे तसेच याकरीता सध्यस्थितीत ग्रामपंचातींकडे पुरेशा प्रमाणात निधी उपलब्ध नसल्यामुळे विभागीय आयुक्त, पुणे यांनी संदभाधीन क्र. ३ च्या पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार राज्य कार्यकारी समितीच्या दिनांक १४.८.२०१९ रोजी झालेल्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार स्वच्छतेसाठी, सानुग्रह मदत व बचाव कार्यासाठी निधी उपलब्ध करण्याबाबत सुचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

१. माहे जूलै-ऑगस्ट, २०१९ मध्ये राज्यात विविध जिल्हयात उद्भवलेल्या पुर परिस्थितीमध्ये व पुर ओसरल्यांनतर पुरामुळे बाधित झालेल्या गावांमध्ये रोगराई येवू नये व साथींचे रोगांचा प्रादुर्भाव होवू नये, मृत जनावरांची योग्य पध्दतीने विल्हेवाट लावण्यासाठी, बाधित क्षेत्रातून पाण्याचा निचरा करणे व संपूर्ण परिसराची साफसफाई व स्वच्छता करण्यासाठी होणारा खर्च करण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील परिच्छेद क्रमांक (४) (अ,ब व क) नुसार संबंधित महानगरपालिका, नगरपालिका व ग्रामपंचायतींना आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यास जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

२. पूरपरिस्थिती निर्माण झालेल्या जिल्हयामध्ये शोध व बचाव कार्य करण्यासाठी विविध उपाययोजनाकरून बाधित व्यक्तींना सुरक्षित स्थळी हलवणे व प्राण वाचविण्यासाठी व मदत कार्यासाठी बोटी भाडयाने घेणे याबाबीवर होणारा खर्च संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील परिच्छेद क्रमांक (२) (अ व ब) नुसार करण्यास संबधित जिल्हाधिकारी यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. पुरपरिस्थिती निर्माण झालेल्या जिल्हातील गंभीरपणे प्रभावित झालेल्या कुटुंबियांना प्रति प्रौढ व्यक्तीस रू ६०/- व प्रति बालकास रू ४५/- प्रति दिन या दराने सानुग्रह अनुदान ३० दिवसांपर्यंत संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन निर्णयासोबतच्या परिशिष्टातील परिच्छेद क्रमांक (१) (आ) नुसार अनुज्ञेय करण्यात येत आहे.

४. वरील परिच्छेद क्रमांक १ व २ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनासाठी होणारा खर्च प्रधान लेखाशिर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च , (९१) (०४) इतर बाबी, ३१ सहाय्यक अनुदाने (२२४५०२४४) या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा.

५. वरील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या बाबीवर होणारा खर्च प्रधान लेखाशिर्ष २२४५ - नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर चक्रीवादळे इत्यादी, १०१ अनुग्रह सहाय्य, (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०१) रोख भत्ता मृत व्यक्तीच्या कुटुंबियांना सहाय्य व जखमींना मदत, ३१ सहाय्यक अनुदाने (२२४५०१५५) या लेखाशिर्षाखाली भागविण्यात यावा.

६. उपरोक्त दोन्ही लेखाशिर्षाखाली होणाऱ्या खर्चासाठी उणे प्राधिकार पत्रावर निधी आहरीत करण्याची सुविधा संदर्भाधीन क्रमांक ४ च्या शासन परिपत्रकान्वये यापूर्वीच देण्यात आलेली आहे. उणे प्राधिकारपत्राची सुविधा देण्यात आलेली असल्यामुळे जिल्हाधिकारी यांनी या प्राधिकाराचा वापर

करताना अत्यंत काळजीपूर्वक व सारासार विचार करून प्राप्त झालेल्या मागणीच्या आधारे तपासणी करून आवश्यक निधी उपलब्ध करून दयावा. तसेच या लेखाशीर्षाखाली करण्यात आलेला खर्चासाठी पुरवणी मागणीव्दारे/पुनर्विनियोजनेव्दारे अर्थसंकल्पीय तरतूद करण्यासाठी खर्चाचा तपशील पुढील अधिवेशनापूर्वी विभागीय आयुक्तांमार्फत या विभागास सादर करण्यात यावा.

७. हे आदेश राज्य् कार्यकारी समितीने दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८१६१६२७२३५४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRIRANG
SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.08.16 16:38:47 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा. विरोधी पक्ष नेता (विधानसभा/विधान परिषद), विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
३. महाराष्ट्र विधानमंडळाचे सर्व सन्माननीय विधान सभा/विधान परिषद सदस्य,
४. अपर मुख्य सचिव (वित्त),मंत्रालय,मुंबई,
५. सर्व विभागीय आयुक्त,
६. सर्व जिल्हाधिकारी,
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
८. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
९. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
११.संचालक,आपत्ती व्यवस्थापन प्रभाग,मंत्रालय, मुंबई
१२. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१३. कार्यासन अधिकारी (म-११/म-३), मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१४. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
१५. निवड नस्ती (कार्यासन / आव्यप्र-१)